| MHSO200004492013 | **नियमित दिवाणी दावा क्र. १३०/२०१३** |
|---|---|

## निशाण क्र. ९४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगीसाठी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस नमूद केलेले आहेत. सबब, सदर वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यासदेखील परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा जाहीरीकरणासाठी, वाटपासाठी व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्टयार्थ नि.क्र. ९५ वर वादीने शपथपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल नि.क्र. ८९/१ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन मयत प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येते. वादीच्या अर्जातील कथन तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. ५ यांच्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादीस प्रतिवादी क्र.

५ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. मयत प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होण्यासाठी वादीने नि.क्र. ९२ वर अर्ज दाखल केला असून तो अर्ज या न्यायालयाने मंजूर केला आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीने नि.क्र. ९२ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांना मयत प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी तसेच तद्अनुषांगिक दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देण्यात येते.

२. वादीने दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत अभिलेखावर सादर करावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.03.11 17:12:26 +0530

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

दिनांक – ११/०३/२०२६ सांगोला.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १२/०३/२०२६ |